
१९६९ पासून
विश्वासाची उज्ज्वल परंपरा

कार्यक्षेत्र–नागपूर जिल्हा

# विवेकानंद
## नागरी सहकारी प्रत्यय संस्था, मर्या.

पंजीयन क्रमांक – एनजीपी/बीएनके/162/1969




मुख्य कार्यालय :

361, रुईकर रोड, चिटणीस पार्क चौक,
महाल, नागपूर-440032.

0712-2776009 • 2726009.

9370981964 • 9325121973, 99370921969.

vivekanandsoc@gmail.com

## संस्थेविषयी थोडेसे

# १९६९ पासून विश्वासाची परंपरा

**'विवेकानंद नागरी सहकारी प्रत्यय संस्था'** ही सन १९६९ मध्ये सामाजिक कार्य करणाऱ्या काही कार्यकर्त्यांद्वारे स्थापन करण्यात आली. संस्थेचा मुख्य उद्देश हा समाजाच्या तळागाळातल्या लोकांना आर्थिक मदत करणे हा होता. ठेवी स्वीकारणे आणि कर्ज वाटप करणे हा संस्थेचा प्रमुख व्यवसाय आहे. संस्थेची सुरुवात आणि व्यवहार, त्यावेळचे कार्यकर्ते जमिनीवर बसून करीत असे. काळानुरूप संस्थेचा व्याप वाढत गेला, सर्व सभासदांच्या विश्वास आणि आशीर्वादाने संस्थेची भरभराट व उत्तरोत्तर प्रगती होत गेली आणि रजत महोत्सवी वर्षात संस्थेने आपली एक स्वतःची वास्तू खरेदी केली आणि एक सुसज्ज कार्यालय थाटण्यात आले. या कार्यालयाचे उद्घाटन नागपूर नगरीचे **तत्कालीन महापौर मा. श्री. देवेन्द्रजी फडणवीस** यांचे शुभहस्ते करण्यात आले होते. येथून खऱ्या अर्थाने संस्थेने गरुड झेप घेत मागे वळून बघितले नाही. वाढता व्याप आणि व्यवसाय बघता ही वास्तु देखील कमी पडतेय हे लक्षात येताच महाल परिसरातच नवीन जागेचा शोध सुरु झाला. 'प्रयत्नांती परमेश्वर' ही प्रचीती येवून 'चिटणीस पार्क समोर, न्यू इंग्लिश शाळेशेजारी मुख्य रस्त्यावर २७०० चौ.फु. जागा खरेदी करण्यात आली. यावर भव्य चार मजली इमारत बांधण्यात आली. या इमारतीचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे **परमपूज्य सरसंघचालक श्रद्धेय मा.श्री.डॉ. मोहनराव भागवत** यांचे शुभहस्ते करण्यात आले. संस्थेची इमारत संपूर्ण वातानुकुलीत असून या मध्ये लिफ्ट, पार्किंग, जनरेटर, २४ तास सुरक्षा गार्ड सह १५० आसन क्षमता असलेले सुसज्ज सभागृह, छोट्या कार्यक्रमांकरिता उपलब्ध आहे. या सभागृहास संस्थेने **संस्थापक सदस्य आणि सामाजिक कार्यकर्ते कै. दिवाकरराव धाक्रस स्मृती सभागृह** असे नामकरण केलेले आहे. इमारतीच्या पहिल्या माळ्यावर संस्थेचे प्रशस्त, वातानुकुलीत, संपूर्ण संगणकीकृत आणि प्रशिक्षित नम्र अधिकारी व कर्मचारी असलेले कार्यालय आहे. सर्व अधिकारी व कर्मचारी सभासदांना वेळेत आणि योग्य सेवा देण्यास कटिबद्ध आहेत.

**संस्थेच्या सुवर्ण जयंती चे औचित्य साधून संस्थेने कोअर बँकिंग प्रणाली विकसित करण्याचे ठरविले असून मुख्य कार्यालयासह तीन शाखा केंद्रीय संगणक प्रणाली द्वारे जोडण्यात आल्या आहेत.** सभासदांना आता कुठल्याही शाखेतून आपले व्यवहार करणे सोयीचे होणार आहे. या प्रणाली द्वारे आपल्या सभासदांना **मोबाईल बँकिंग, एस.एम.एस. सुविधा, एन.ई.एफ.टी., आर.टी.जी.एस., क्यू.आर. कोड** इत्यादी सुविधा देखील प्राप्त करता येणार आहे. यामुळे व्यवहारातील पारदर्शकता आणि विश्वसनीयता दृढ होईल.

संस्थेकडे प्रशिक्षित कर्ज वसुली विभाग असून सातत्याने थकीत कर्जदारांकडे लक्ष ठेवुन पाठपुरावा सुरु असतो. **याचे फलित म्हणजे संस्थेचे एनपीए प्रमाण अगदी नगण्य आहे.** कोरोना काळात देखील संस्थेने योग्य दिशेने आपला व्यवसाय करून तसेच कर्जदारांना विश्वासात घेवून आपली वसुली करण्याचे कसब दाखविले फलस्वरूप झालेला भरघोस नफा इतर आर्थिक संस्थेच्या तुलनेत अधिक होता. **संस्थेचा दरवर्षीचा नफा एक कोटीहून अधिक असतो. संस्थेला स्थापनेपासूनच ऑडीट वर्ग 'अ' कायम आहे.**

संस्थेने नुकतेच **सुवर्ण महोत्सवी वर्षात** पदार्पण केले असून या वाटचालीमध्ये सभासदांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. सभासद, ग्राहक आणि हितचिंतकांच्या विश्वास व सहकार्यानेच संस्था यशोशिखर गाठत आहे. भविष्यातही सभासदांचे सहकार्य, विश्वास आणि प्रेम वृद्धिंगत व्हावे अशी अपेक्षा संचालक मंडळ व्यक्त करीत आहे.

सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोनातून संस्था दरवर्षी उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांना निधी समर्पित करीत असते. **संस्थेने आजवर शेकडो सामाजिक संस्थांना आर्थिक मदत केलेली आहे. कोरोनाच्या बिकट परिस्थितीत संस्थेने सुसज्ज अशी वातानुकुलीत ॲम्बुलंस "लोककल्याण समितीच्या" माध्यमातून रुग्णांच्या सेवेत समर्पित केली आहे.**

संस्थेच्या एकूण ३ सुसज्ज शाखा **महाल मुख्य शाखा, प्रताप नगर शाखा आणि हुडकेश्वर शाखा** ग्राहकांच्या सेवेत कार्यरत असून सर्व शाखा उत्कृष्ट व्यवसाय करीत आहे.

## विविध कर्ज योजना

- सुवर्ण खरेदी / तारण कर्ज योजना
- घर बांधणी/ खरेदी कर्ज योजना
- वैयक्तिक कर्ज मर्यादा रू. १०००००
- वाहन कर्ज योजना
- शैक्षणिक कर्ज योजना
- व्यावसायिक वाहन कर्ज योजना
- पगार कपात कर्ज योजना
- सोलर कर्ज योजना
- घर दुरुस्ती कर्ज योजना
- वैयक्तिक कर्ज योजना (पॉलीसी तारणी कर्ज)
- विवेक संचय नियमित कर्ज योजना
- तारणी कर्ज योजना

## विविध ठेव योजना

- मुदत ठेव
- मासिक मुदत ठेव

ज्येष्ठ नागरिकांना
**0.5%** जास्त व्याज दर

**चालू खाते**
आता मिळवा
**CURRENT ACCOUNT**
वर
**3%**
व्याज दर

- बचत ठेव
- आवर्त ठेव
- दैनिक बचत ठेव

## संस्थेच्या सेवा-सुविधा

- NEFT RTGS
- CORE BANKING
- LOCKERS
- Swapping Machine
- MOBILE BANKING
- QR CODE

## संस्थेची वैशिष्ट्ये

- दरवर्षी ऑडीट वर्ग 'अ' मिळणारी एकमेव संस्था.
- झालेल्या व्यवहाराची 'एसएमएस' ने त्वरित माहिती.
- बँकिंग संबंधित सर्व आधुनिक सुविधा देणारी एकमेव संस्था.
- संपूर्ण संगणकीकृत. • सुसज्ज वातानुकुलीत संस्था. • विविध कर्ज योजनांतर्गत त्वरीत कर्ज उपलब्ध.
- ठेवींवर आकर्षक व्याजदर. • अनुभवी संचालक, अधिकारी व नम्र कर्मचारी. • तत्पर सेवा

**१५० आसन क्षमतेचे वातानुकुलीत सुसज्ज**
**कै.श्री. दिवाकरराव धाक्रस स्मृती सभागृह कार्यक्रमांसाठी उपलब्ध**

# MOBILE BANKING




१९६९ पासून विश्वासाची उज्वल परंपरा

पंजीयन क्रमांक - एनजीपी/बीएनके/162/1969

# विवेकानंद
## नागरी सहकारी प्रत्यय संस्था, मर्या.

विवेकानंद नागरी सहकारी प्रत्यय संस्था मर्या. स्थापना १९६९

मुख्य कार्यालय : 361, रुईकर रोड, महाल, नागपूर-440032.
0712-2776009, 2726009 09370981964 e-mail : vivekanandsoc@gmail.com

**महाल मुख्य शाखा**
361, चिटणीस पार्क समोर, रुईकर रोड, महाल, नागपूर-440032.
0712-2957477 09175217758. e-mail : vivsocmahalbr@gmail.com

**प्रतापनगर शाखा**
361, ब्लॉक नं. 3,4,5,6, SE RLY, EMP STF सोसायटी कॉम्प्लेक्स, नक्षत्र सेलिब्रेशन जवळ, प्रतापनगर, नागपूर-440026. 0712-2955526 07028901974. vivekanandsocpnagar@gmail.com

**हुडकेश्वर शाखा**
प्लॉट नं. 2, स्वस्तिक संकुल, ॲक्सिस बँक बाजूला, हुडकेश्वर रोड, नागपूर-440024
0712-2751888 09975711966 vivekanandsochkr@gmail.com

कार्यालयीन कामकाजाची वेळ- सोमवार ते शुक्रवार सकाळी 11.30 ते सायंकाळी 6.30 वाजेपर्यंत.
शनिवार : सकाळी 11.30 ते दुपारी 2.30 वाजेपर्यंत. • घोषीत सुट्या अवकाश

ideaz creative 9881971528

१९६९ पासून विश्वासाची उज्वल परंपरा

कार्यक्षेत्र–नागपूर जिल्हा

# विवेकानंद

## नागरी सहकारी प्रत्यय संस्था, मर्या.

पंजीयन क्रमांक – एनजीपी/बीएनके/162/1969

## विविध कर्ज योजना

| | | | |
|---|---|---|---|
| 10% सुवर्ण खरेदी/तारण कर्ज योजना | 11% घर बांधणी/खरेदी कर्ज योजना | 12% सोलर कर्ज योजना | 12% वाहन कर्ज योजना |
| 12% शैक्षणिक कर्ज योजना | 12% व्यावसायिक वाहन कर्ज योजना | 13% तारणी कर्ज योजना | 13% घर दुरुस्ती कर्ज योजना |
| 14% पगार कपात कर्ज योजना | 15% वैयक्तिक कर्ज योजना (पॉलीसी तारणी कर्ज) | 15% विवेक संचय नियमित कर्ज योजना | 15% वैयक्तिक कर्ज मर्यादा रू.100000 |

**संस्थेच्या ठेवीचे आकर्षक व्याज दर दिनांक 15.12.2022 पासून लागू**

### मुदत ठेव व मासीक मुदत ठेव

| | |
|---|---|
| 1 महिना ते 3 महिने | 4.5% |
| 4 महिना ते 6 महिने | 5.5% |
| 7 महिना ते 12 महिने | 6.5% |
| 13 महिना ते 3 वर्ष | 7.0% |

ज्येष्ठ नागरिकांना मुदत ठेवी वर 0.5% जास्त व्याज दर

| आवर्त ठेव | बचत ठेव |
|---|---|
| 1 वर्ष ते 3 वर्ष- 7% | 4% |

दैनिक बचत ठेव
विवेक संचय योजना

### संस्थेच्या सेवा-सुविधा

- NEFT•RTGS DD
- CORE BANKING
- LOCKERS
- Swapping Machine
- MOBILE BANKING
- QR CODE

**समृध्दीचा मंत्र खरा... बचतीची कास धरा...**